जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३३० दिनांक - २०/०८/२०२४**

युनिट ३ गुन्हे शाखा,पुणे शहर

## रेकॉडवरील गुन्हेगार गावठी पिस्टलसह जेरबंद

दि.१५/०८/२०२४ रोजी स्वांतत्र्य दिनाच्या अंनुशंगाने गुन्हे शाखा युनिट ३ मधील अधिकारी व स्टाफ असे रेकॉडवरील गुन्हेगार चेकिंग व लॉज चेकीग व अवैध्य धंदयावर कारवाई करण्याकरिता गस्त करित असताना पोलीस अंमलदार प्रतिक मोरे यांना बातमी मिळाली की, मागील दोन दिवसापुर्वी अप्पर डेपो, बिबबेवाडी, पुणे येथे इसम नामे गणेश उदय जाधव वय २१ वर्षे, रा. गणेश नगर सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे याने एका इसमास धमकवण्यासाठी पिस्टल दाखवला होता तो सध्या गणेश पुरी, रामनगर, वारजे माळवाडी, सार्वजनिक रोडवरती, पुणे येथे थांबलेला आहे अशी बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन नमुद इसमाचा शोध घेतला असता पत्यावर मिळुन आल्याने त्याच्या कडुन कि.रु.४,००००/- चे देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल मिळुन आले.

नमुद आरोपी नामे गणेश जाधव रा.वारजे माळवाडी, पुणे याचे विरुध्द तो विधीसंघर्ष ग्रस्त बालक असताना खुन व बेकायदेशिर जमाव जमवुन दुखापत करणे असे कोथरूड व सिंहगड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद आहे. त्याचे विरुध्द अग्नीशस्त्र बाळगले बाबत पोलीस अंमलदार प्रतिक मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वारजे माळवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३२२/२०२४ भारतीय शस्त्र अधि कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७(१)सह १३५,नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे .

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री रंजनकुमार शर्मा, मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे शहर श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे शाखा पुणे शहर श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १,पुणे शहर. श्री.गणेश इंगळे, यांचे मार्गदर्शन व सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक, युनिट ३ गुन्हे शाखा रंगराव पवार सहा.पो.निरीक्षक ज्ञानेश्वर ढवळे, पोलीस अंमलदार शरद वाकसे,विनोद भंडलकर ,सुजित पवार,केदार आढाव,संजीव कळंबे,इसाक पठाण,हरिष गायकवाड,ज्ञानेश्वर चित्ते,राकेश टेकावडे, प्रतिक मोरे,गणेश शिंदे,सोनम नेवसे यांनी कामगिरी केलेली आहे.